**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022**
**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा. क्र. वनार्टी/आस्था/परिपत्रक/668/2026-27 दिनांक :-22/07/2026

## -: परिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी अर्थसहाय्य योजनेकरीता पात्र व अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना वनार्टी संस्थेव्दारे अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविले असता, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य योजने अंतर्गत दि. 20/07/2026 रोजी पर्यंत **एकूण** - 651 अर्ज वनार्टीच्या संकेतस्थळावर प्राप्त झालेले होते.

त्यानुसार MPSC ने जाहिर केलेल्या निकालानुसार व वनार्टी कार्यालयाच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त अर्जांची छाननी केली असता, **प्राप्त एकूण** - 651 अर्जांपैकी **एकूण** - 175 विद्यार्थ्यांचे अर्ज सदर योजनेकरीता पात्र ठरलेले आहेत, तसेच **एकूण** - 476 विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आढळुन आलेली आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्याकरीता **दि.** 27/07/2026 रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे. त्यानुसार पात्र व अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी वनार्टी संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**स्वा**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर